# ऑनलाइन विश्‍व साहित्य संमेलन आजपासून

**पुणे, ता. ४ :** दिवसाचे २४ तास सुरू असणारे साहित्य संमेलन... केवळ साहित्यिकच नव्हे, तर तुमचाही सहभाग... निवडणूक, वाद, मानापमान याऐवजी केवळ साहित्यविषयक चर्चेला महत्त्व... प्रवास खर्चही काहीच नाही... असे आगळे-वेगळे 'बुकगंगा विश्‍व साहित्य संमेलन' गुरुवारपासून (ता. ५) सुरू होत आहे. विशेष म्हणजे, जगभरातील वाचकांना यात घरबसल्या सहभागी होता येणार आहे.

अमेरिकेतील माय विश्‍व कॉर्पोरेशनतर्फे www.vishwasahityasammelan.org या संकेतस्थळावर ५ ते १५ सप्टेंबर या कालावधीत हे संमेलन होणार आहे. या संकेतस्थळाचे उद्‌घाटन समीक्षक शंकर सारडा यांच्या हस्ते झाले. या वेळी धनंजय दातार, प्रकाश भोंडे उपस्थित होते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भारतीय साहित्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा, यासाठी याचे आयोजन करण्यात आले आहे. लेखक, प्रकाशकांबरोबरच ब्लॉगर, विद्यार्थी, गृहिणी, अशा अनेकांना यात सहभागी होता येईल.

'फेसबुक'च्या माध्यमातूनही त्यांना सहभाग नोंदविता येईल. दिलेल्या विषयांवर मते मांडता येतील. कविता 'पोस्ट' करता येतील. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, अशी माहिती कॉर्पोरेशनचे संस्थापक मंदार जोगळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.